REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
(टपाल हंशिल माफ)
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख २९ जून, १९३८ अंक २६

एका बाळाची नको, एका कुळाची नको,
साऱ्या प्रजेची आई हो!

एका प्रेमळ स्त्रीहृदयाची सर्व सुप्त सात्त्विकता जागृत व्हावी असेच हे उद्गार नाहींत काय?

दुसरा आठवडा दुसरा आठवडा

☞ मिनर्व्हा–टॉकीज ☜

शनिवार ता. २५ पासून सुरू

मराठी बोलपट

'हंस'कृत

ज्वाला

भूमिका—
चंद्रमोहन, रत्नप्रभा, आशालता, विनायक, मांडरे, रजनी, जावडेकर. इ०

कथालेखक—वि. स. खांडेकर
दिग्दर्शक—विनायक
चित्रलेखक—पांडुरंग नाईक

दररोज दोन खेळ ६॥ व १० वाजतां व शनिवार रविवार जादा खेळ दुपारीं ३॥ वाजतां

आठवड्यामागून आठवडे झपाझप वाढत आहेत! जशा कांहीं पावसाच्या सरीवर सरी झडत आहेत!

येरे येरे पावसा—तुला देतो पैसा— पावसाळ्यांत हें गाणं गात गात गिरक्या मारण्यांत लहान मुलां मुलींना फार मौज वाटते हें जरी खरें असलें तरी सध्यां मात्र बालगोपाल हें गाणें खास म्हणणार नाहींत।

नवलाचा
९ वा आठवडा

) ध्रुव (

कारण, जर खरोखरच पाऊस पडूं लागला तर चिमुकला ध्रुव पहाण्यास मुकावें लागणार!

ग्लोब टॉकीज, शनिवार ता. २५ पासून सुरू

प्रभा पिक्चर्सचा मराठी बोलपट

दररोज दोन खेळ ६॥ व १० वाजतां. शनि. रवि. जादा खेळ दु. ३॥ वा.

विविध माहिती

आगबोटींतील कायम उतारू

ग्रेट ब्रिटनमध्यें स्थाइक होण्यापेक्षा आगबोटींतून प्रवास करीत रहाणें काटकसरीचें आहे, असा मेजर लॅंग ह्या इंग्रजाचा अनुभव आहे. इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया ह्यांचे दरम्यान एकाच बोटीनें ओळीनें बारा सफरी पुऱ्या करून त्यानें आतां दक्षिण अमेरिकेकडे जाणाऱ्या-येणाऱ्या आगबोटींत ठाणें देण्याचें योजिलें आहे.

बॅरोनेट

ग्रेट ब्रिटनमध्यें एकूण १,५७७ बॅरोनेट आहेत. सर हिक्मन बेकन हा पहिला बॅरोनेट होय. त्यास १६११ सालीं पहिल्या जेम्सनें ही पदवी दिली.

आयुर्विम्याचा अमेरिकेंत प्रसार

अमेरिकेंतील निम्यापेक्षा अधिक लोकांनीं, म्हणजे ६३ कोटि नागरिकांनीं आपल्या आयुष्याचा विमा उतरविलेला आहे. त्यांच्या पॉलिसींची संख्या १३ कोटि असून त्यांची किंमत २९०३ अब्ज रुपये भरते. हिंदुस्थानांतील विमा पॉलिसींची किंमत अवघी २३ अब्ज रुपये आहे.

क्लिअरिंग हाऊसमधील चेक्सची देवघेव

मुंबई येथील क्लिअरिंग हौसमध्यें ता. २४ जून रोजीं संपलेल्या आठवड्यांत १४ कोटि १५ लक्ष रुपये किंमतीच्या ९१,१९७ चेक्सची देवघेव झाली.

वरळी चाळींत रहावयास जा

वरळी येथील डेव्हलपमेंट डिपार्टमेंटच्या चाळींकडे गिरणी कामगारांस आकर्षण्याचे प्रयत्न मुंबई सरकारनें चालविले आहेत. सध्या तेथील अनेक खोल्या पडून आहेत.

वळूचा नजराणा

हिंदुस्थानचे व्हाइसरॉय, लॉर्ड लिनलिथगो, ह्यांस अफगाणिस्तानच्या मुख्य प्रधानांनीं नजर म्हणून एक चांगला वळू आणि एक सवत्स गाय पाठविली आहे. ही भेट मोटारीनें दाखल झाली, त्यावेळीं व्हाइसरॉयांनीं त्यांचें समक्ष अवलोकन केलें. परत भेट देण्यासाठीं त्यांनीं एका वळूची निवड केली आहे.

उपवर वधूंकरितां शाळा

विवाहेच्छू वधूंस लायक बनविणारें शिक्षण देण्यासाठीं जपानमध्यें एक शाळा स्थापन करण्यांत आली आहे, तीमध्यें एक हजार विद्यार्थिनींची शिक्षणाची सोय आहे.

ट्रेझरी बिलांवर १ रु. २ आ. ३ पै व्याजाचा दर

हिंदी रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत १ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. २ आ. ३ पै इतका पडला.

डी व्हॅलेराचा विजय

आयर्लंडमधील पार्लमेंटची निवडणूक नुकतीच पार पडली. डी व्हॅलेरा पक्षाचे ७७ उमेदवार यशस्वी होऊन, त्या पक्षास पार्लमेंटमध्यें प्रभावी मताधिक्य मिळालें. गेल्या पार्लमेंटांत डी व्हॅलेराचा पक्ष आणि सर्व विरोधी पक्षांचे गट ह्यांचें तुल्यबल होतें.

विम्याची पहिली पॉलिसी

सन १६५३ सालीं विल्यम गिब्सन ह्याच्या आयुष्याचा एका वर्षाचे मुदतीचा विमा उतरण्यांत आला. ह्याचे आधीच्या पॉलिसीची लेखी नोंद उपलब्ध नाहीं.

कराची येथील सिमेंटचा कारखाना

डालमिया सिमेंट लि. च्या कराची येथील सिमेंटच्या कारखान्याचें उद्घाटन ४ जुलै रोजीं होणार आहे. ह्या कारखान्यांत दररोज ४०० टन सिमेंटचें उत्पादन होऊं शकेल. कारखान्यास लागणारा कच्चा माल आणि तयार झालेलें सिमेंट ह्यांच्या वहातुकीसाठीं एका स्वतंत्र आगबोटीची योजना करण्यांत आली आहे.

टॅक्सीचा दर चार आणे होणार ?

मुंबई येथील भाड्याच्या मोटारींचा दर मैलास सहा आणे आहे, तो चार आणे करावा, असें टॅक्सीवाल्यांचें बहुमत आहे. बॉंबे टॅक्सी ड्रायव्हर्स युनियनची वार्षिक साधारण सभा नुकतीच भरली होती, त्यावेळीं ५०० सभासदांपैकीं ४९१ सभासदांनीं चार आणे दरास अनुकूल मत दिलें.

" सचोटी पेट्या "

ग्रेट ब्रिटनमधील बोर्निमथ शहरांतील भाड्याच्या बसेसमध्यें " सचोटी पेट्या " ठेवण्यांत आल्या आहेत. बसच्या कंडक्टरचें नजरचुकीनें भाडें वसूल करावयाचें राहिलें असेल, तर उतारूनें खालीं उतरतांना त्या पेटींत तें टाकावें, असा त्यांत हेतु आहे. गेल्या वर्षी अशा पेट्यांतून सुमारें २३ हजार रुपये सांपडले.

स्वीडनमधील नवीन करयोजना

आर्थिक मंदींतून कारखाने सुखरूपपणें बाहेर पडावे, ह्या हेतूनें स्वीडनमध्यें एक कायदा करण्यांत येत आहे. मंदीच्या वेळीं उपयोग व्हावा ह्यासाठीं स्वतंत्र फंडांत आपला नफा राखून ठेवणाऱ्या कंपन्यांस, ह्या रकमांवरील कर भरण्यास मुदतीची सवलत देण्यांत येते आणि ह्या फंडांचा विनियोग करण्याची पाळी आली तर कर अजिबात माफ होतो.

शास्त्रीय संशोधनांत जर्मनीचें अग्रेसरत्व

शास्त्रीय संशोधनासाठीं दरसाल देण्यांत देणारीं "नोबेल" बक्षिसें चालू शतकांत जर्मनीनें ३० वेळां पटकावलीं आहेत. इंग्लंड, फ्रान्स आणि अमेरिका ह्यांचा अनुक्रम नंतर बराच खालीं लागतो. एकूण १६ देशांतून हीं बक्षिसें वाटलीं गेलीं आहेत. गेल्या १० वर्षांत मात्र जर्मनीस आपलें उच्च स्थान राखतां आलेलें नाहीं.

शास्त्राभिवृध्यर्थ स्वतःच्या शरीराचें दान

ग्रेट ब्रिटनमधील मिस् आर्मस्ट्रॉंग ह्या एका श्रीमंत स्त्रीनें आपल्या मृत्युपत्रांत, स्वतःचें मृत शरीर एका इस्पितळास शास्त्रीय ज्ञानाच्या उपयोगासाठीं देण्यांत यावें, असें लिहून ठेवलें. स्वतःचें शरीर कायद्यान्वयें विकतां येत नाहीं, परंतु मृत्युपत्रांत त्याचा विनियोग करतां येतो.

दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि.

वरील बँकेच्या सोलापूर येथील शाखेचें उद्घाटन २३ जून रोजीं श्री. जमनादास मेहता ह्यांचे हस्तें झालें. श्री. सी. एम. वारद हे सोलापूर शाखेचे अध्यक्ष आहेत.

मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत

	रुपये किंमत
१२-६-३८ ते १८-६-३८	निर्गत झाली नाहीं.
१९-६-३८ ते २५-६-३८	३४,६४,८६०
२१-९-३१ ते २५-६-३८	३,१५,२१,०१,७८७

अनुक्रमणिका

	पृष्ठ		पृष्ठ
१ विविध माहिती ...	३१२	५ सहकारी अर्बन बँका ...	३१६
२ सहकारी चळवळीची पुनर्घटना	३१३	६ त्रावणकोर बँकेचे व्यवहार तात्पुरते बंद ...	३१७
३ वेस्टर्न इंडिया विमा कं.ची प्रगति	३१४	७ ब्रिटिश कापडाची निर्गत मंदावली	३१७
४ स्फुट विचार	३१५	८ योजनात्मक आर्थिक धोरण ...	३१८
शिक्षण तज्ञ विलायतेतून येणार ! —हिंद-ब्रिटन व्यापारी करारार्चे भवितव्य-उलट्या हुंड्या विकाव्या लागणार कीं काय ?—नवीन विमा कायदा—श्री. जमनादासांची टीका		९ व्यापारी व्यवहारांतील वाढावा आणि कसर	३२०
		१० स्टॉक एक्सचेंजचे ... सभासद	३२१
		११ साखरेऐवजी वाळू ...	३२१
		१२ पराडकर टेलरिंग ॲकॅडिमी	३२२
		१३ निवडक बाजारभाव	३२३

अर्थ

बुधवार, ता. २९ जून, १९३८

सहकारी चळवळीची पुनर्घटना

कोणतीहि चळवळ जोमदार व पायाशुद्ध रीतीनें चालावयाची असेल तर तिच्या परिस्थितीचें वेळोवेळ सिंहावलोकन होणें आणि तीमध्यें युक्त असे फेरफार केले जाणें अगत्याचें असतें. तिची घटना व कार्यपद्धति ह्यांमध्यें दोष उत्पन्न होत असतात आणि तिची उपयुक्तता मर्यादित होऊन तिची गाडी भलत्या रुळांवरून जात असल्याचें दिसून येतें. ह्यासाठी हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांतील सरकारांनीं आठ-दहा वर्षांमागेंच कमिट्या नेमून सहकारी चळवळीच्या चौकशा करवल्या आणि शेतकी कमिशन व बँकिंग कमिट्या ह्यांनींहि त्या चळवळीचा आपापल्या परी परामर्श घेतला. मुंबई इलाख्यांत मात्र स्वतंत्र अशी चौकशी झालेली नाहीं आणि चळवळीच्या विशिष्ट अंगांचाच काय तो विचार झालेला आहे. प्रचलित आर्थिक मंदीचे हानिकारक परिणाम सहकारी संस्थांवर उत्कट रीतीनें झाल्याचें दिसून आल्याकारणानें कॉंग्रेस प्रधानमंडळानें ह्या प्रश्नास तात्काळ हात घातला. श्री. भनसाळी आणि श्री. वैकुंठराय मेथा ह्यांस प्रांतिक सहकारी चळवळीच्या पुनर्घटनेसंबंधानें शिफारसी करण्यास त्यांनीं सांगितलें. त्यांच्या रिपोर्टावर थोडीबहुत चर्चा झाली असून कांहीं शिफारसींची अंमलबजावणीहि चालू आहे. तथापि, त्यांनीं सुचवलेल्या पुनर्घटनेच्या योजनेसंबंधानें चांगलीशी कल्पना फारच थोड्या कार्यकर्त्यांस आहे. सूचनांचें समर्थन किंवा स्पष्टीकरण त्यांत नसल्याकारणानें त्यांचा रिपोर्ट उद्बोधक होण्यासारखा नाहीं आणि म्हणूनच तो जनतेच्या माहितीकरितां प्रसिद्ध केलेला नाहीं. पण त्यांतल्या शिफारसींची अंमलबजावणी व्हावयाची असतां त्यांची चर्चा कार्यकर्त्यांशीं न झाल्यास प्रगति कशी होणार ? ह्याकरितां सहकारी खात्यानें अशी चर्चा जबाबदार कार्यकर्त्यांशीं ठिकठिकाणीं घडवून आणणें अगत्याचें आहे असें आम्हांस वाटतें. पुनर्घटनेची व विस्ताराची सर्व जबाबदारी सरकारी अधिकाऱ्यांनीं उचलणें इष्ट नाहीं.

ह्या दृष्टीनें, श्री. वैकुंठराय मेथा ह्यांनीं पुणें जिल्हा सहकारी इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें गेल्या शनिवारीं आपल्या रिपोर्टांतील शिफारसींच्या स्पष्टीकरणार्थ स्वतःच्या प्रेरणेनें विस्तृत व्याख्यान दिलें, हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असा झाला. चळवळीच्या हिताविषयींची त्यांची कळकळ त्यांत स्पष्ट झाली. त्यांच्यासारखा रिपोर्टाचा एक लेखक आणि कार्यकर्ता ह्यांनीं स्वतः केलेलें विवेचन ऐकण्यांत श्रोत्यांस फारच मोठा लाभ झाला. चळवळीची पुनः प्रस्थापना, पुनर्रचना आणि तिचा विकास असे आपल्या विषयाचे तीन भाग करून त्यांनीं प्रत्येकाचा योग्य परामर्श घेतला. सहकारी संस्था, विशेषतः शेतकी पतपेढ्या, ह्यांचे पैशाचे व्यवहार गोठून गेले आहेत, त्यांचे प्रवाह पुन्हां चालू होण्यासाठी काय केलें पाहिजे ह्याचें विवेचन त्यांनीं प्रथम केलें. पेढ्यांच्या कर्जांची छाननी व वर्गीकरण, संशयित व बुडत्या कर्जांची चौकशी, हप्तेबंदीनें वसुलीची व्यवस्था, पेढ्यांच्या व बँकांच्या गळ्यांत पडलेल्या जमिनींची योग्य विल्हेवाट इत्यादि दिखाऊ नव्हेत, पण फलदायी उपाय त्यांनीं सुचविले. लवाद निवाडे त्वरित होऊन त्यांची अंमलबजावणी कार्यक्षम रीतीनें घडून येण्याचें महत्वहि त्यांनीं प्रतिपादलें. पुनर्रचनेच्या प्रश्नासंबंधीं त्यांनीं उल्लेखिलेल्या बाबी येणेंप्रमाणें:—पिकाच्या विक्रीमधून कर्ज वसूल होण्याची तजवीज; शेतीच्या मालाची साठवण व त्याच्या तारणावरचीं कर्जें; अनेक हेतु असलेल्या सोसायट्यांची (मल्टिपर्पज सोसायटीज) स्थापना; बँकिंग यूनिअन्सची घटना; अर्बन बँकेची योग्य व्याख्या; बँकांचीं ऑडिट व सुपरव्हायजिंग फेडरेशन्स; सेंट्रल बँकांस बिनसरकारी ऑडिटर नेमण्याची सवलत इ. इन्टिट्यूटच्या पुनर्घटनेंत त्याची कार्यमर्यादा आकुंचित करण्यांत आली आहे. ह्या वादग्रस्त विषयासंबंधानें श्री. वैकुंठराय ह्यांनीं असें सांगितलें कीं डिस्ट्रिक्ट बोर्ड्स ऑफ सुपरव्हायजिंग युनिअन्सना इन्टिट्यूटच्या कार्यक्षेत्रावर आक्रमण लोकांनीं करूं दिलें आणि बँक्स कॉन्फरन्स सारख्या स्वतंत्र संस्था अस्तित्वांत आल्या ह्या कारणानें जिल्ह्या इन्स्टिट्यूट्सची आवश्यकता नाहींशी झाली आणि शिक्षण व प्रचार एवढींच कामें त्याकडे ठेवणें अपरिहार्य झालें. ह्याप्रमाणें बदललेल्या परिस्थितीस अनुसरून आक्षिप्त घटना सुचवणें प्राप्त झालें आहे असा त्यांच्या स्पष्टीकरणाचा आशय होता. सहकारी चळवळीच्या कार्याचा विस्तार हा व्याख्यानाचा तिसरा भाग होता. शेतांचें एकीकरण, संयुक्त शेती, जमीनीची सुधारणा, दुय्यम खेडेगांवी धंदे, तालुका डेव्हलमेंट असोसिएशन्स, स्त्रीवर्गास चळवळीमध्यें आकर्षून घेण्याचें महत्व आणि शेतकऱ्यांची मिळकत वाढवण्याची आवश्यकता इत्यादि बाबींचा अंतर्भाव त्यांत करण्यांत आला.

श्री. वैकुंठराय ह्यांनीं आपल्या भाषणांत स्वतःच्या रिपोर्टाचें विहंगम दृष्टीनें अवलोकन आणि धांवतें विवेचन उत्कृष्ट रीतीनें केलें हें वरील गोषवाऱ्यावरून दिसून येईल. त्यांतले कित्येक मुद्दे व्यावहारिकता व फलद्रूपता ह्यांचे दृष्टीनें वादग्रस्त आहेत ह्याविषयीं त्यांस स्वतःला जाणीव असली पाहिजे. मल्टिपर्पज सोसायटीज व बँकिंग यूनिअन्स ह्यांची स्थापना आजवरच्या अनुभवावरून कितीशी यशस्वी होईल ह्याची शंका कार्यकर्त्यांस वाटणें साहजिक आहे. चळवळीचा योजिलेला विस्तार करून त्यावर सारखी नजर ठेवावी लागेल, ती कोणी ठेवावयाची ? त्यास कार्यकर्ते व पैसा लागेल, तो कोठून येणार त्याचा विचार वेळीच झाला पाहिजे. नुसतें यंत्र उभें करून भागणार नाहीं,

त्यांत शक्ती व गति निर्माण झाली पाहिजे. शिक्षण व प्रचार ह्यांची आवश्यकता निर्विवाद आहे. परंतु सहकारी चळवळीचें मूळभूत तत्त्व विश्वासमूलक संस्थांच्या सभासदांमध्यें जबाबदारीची जाणीव आणि स्वावलंबनाची व जुटीनें वागण्याची संवय, हें आहे. त्याचा विकास व जोपासना झाल्यावांचून पुनर्रचना आणि विस्तार हीं व्यर्थ आहेत. इन्स्टिट्यूट सारख्या मध्यवर्ती लोकप्रतिनिधींच्या संस्थेचा ऱ्हास होण्याचीं कारणें शोधून काढून तीं दूर करणें आणि त्याची पायाशुद्ध पुनर्रचना करणें वास्तविक रीत्या अत्यंत अगत्याचें आहे. पतपेढ्यांची सध्याची हलाखीची स्थिति सुधारून शेतकरीवर्गाची उन्नती ज्यांचे योगें होईल अशा उपायांची योजना श्री. वैकुंठराय ह्यांनीं मार्मिकपणानें दर्शविलेल्या मार्गांनीं करण्यास झटणें आवश्यक आहे, ह्यांत वाद नाहीं आणि ह्या बाबतींतल्या त्यांच्या कमिटीच्या सूचनांबद्दल तिचे आभार मानणें उचित आहे. परंतु सहकारी संस्थांतली कर्जबाजारी, त्यांच्या कारभाराची कार्यक्षमता, सभासदांमध्यें जबाबदारीची व सहकारितेची जाणीव, निरपेक्ष कार्यकर्त्यांचा पुरवठा, काटेकोरपणाची देखरेख इत्यादि बाबी चळवळीच्या आत्म्यासारख्या आहेत. पुनर्घटनेच्या कार्यक्रमांत त्यांस योग्य स्थान देण्यांत आलें पाहिजे. कॉंग्रेस प्रधानमंडळाच्या पाठीमागें प्रचंड लोकमत आहे आणि वरील मूलग्राही प्रश्नास हात घालणें त्यास शक्य आहे. सहकार मंदिराची पुनर्रचना आणि विस्तार करण्याच्या प्रयत्नांत त्याचा पाया खचला आहे तो भक्कम करण्याकडे लक्ष पुरवलें जात नाहीं असें दिसतें. त्या संबंधांतले आवश्यक ते उपाय योजले गेले पाहिजेत असें आम्हांस वाटतें.

वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची अखंड प्रगति

सातारा येथील वेस्टर्न इंडिया विमा कंपनीची प्रगति १९३७ सालींहि अखंड चालू होती, असें तिच्या १९३७ साल अखेरच्या २४ व्या वार्षिक अहवालावरून दिसून येतें. अहवालाचे वर्षी कंपनीनें ६७ लक्ष, ३५ हजार रुपयांचें काम पुरें केलें. तिनें उतरविलेल्या विम्यांचे रकमेंत दरसाल वाढ होत आहे. कंपनीस हप्त्यांचे रूपानें १९३७ सालीं एकूण १८ लक्ष, ४७ हजार रुपये, म्हणजे गेल्या वर्षीपेक्षां २ लक्ष ३६ हजार रुपये ज्यास्त मिळाले. कंपनीजवळील रोख्यांचें व्याज सुमारें ३¾ लक्ष रुपये भरलें. विमा खातीं फंडांत ११¾ लक्ष रुपयांची भर पडून हा फंड ८२¾ लक्ष रुपये झाला. कंपनीनें आपले पैसे अत्यंत किफायतशीरपणें गुंतविलेले आहेत. लाइफ फंडांतील रकमांवर सरासरीनें ४·९९ टक्के दरानें व्याज पडलें. १९३६ सालीं व्याजाचा दर ४·९४ टक्के पडला होता. दरांतील ही वाढ सध्याच्या हलक्या व्याजाचे दिवसांत कंपनीस निःसंशय भूषणावह आहे. कंपनीच्या ताळेबंदांत तिच्या रोख्यांची मूळ पडलेली किंमत दर्शविलेली आहे ती आजच्या बाजारभावानें होणाऱ्या किंमतीपेक्षां १३ लक्ष, ३७ हजार रुपयांनीं लहान आहे. म्हणजे, एवढ्या रकमेचा हा एक प्रकारचा गुप्त रिझर्व्ह तयार झालेला आहे. अशा रीतीनें ताळेबंदास मजबुती आली आहे. आपल्या जिंदगीमधील रोख्यांची किंमत वस्तुस्थितीपेक्षां कमी म्हणजे मूळ किंमती इतकीच धरण्याचें वेस्टर्न इंडियाचें धोरण अत्यंत सावधपणाचें आणि शास्त्रशुद्ध असून इतर कंपन्यांस तें मार्गदर्शक होण्याजोगें आहे. कंपनीकडे सध्या एकूण ३¾ कोटि रुपये किंमतीचे विमे चालू आहेत आणि तिचें सालिना उत्पन्न २२½ लाख रुपयांहून अधिक आहे. तिनें आजवर क्लेम्सच्या रूपानें सुमारें २२ लक्ष रुपये विमेदारांस अगर त्यांच्या वारसांस दिलेले आहेत. वेस्टर्न इंडियाची काटकसरीच्या कारभाराबद्दल विशेष ख्याती आहे. तिच्या खर्चाचें उत्पन्नाशीं प्रमाण १९३६ सालीं शेकडा २६·३१ इतकें होतें तें १९३७ सालीं आणखी खालीं उतरून २४·८३ इतकें झालें. आज हिंदुस्थानांत विमा कंपन्यांचा खर्च प्रमाणाबाहेर जाऊं लागला आहे आणि नवीन कायद्यानें त्यास प्रतिबंध होईल अशी अपेक्षा नाहीं. वेस्टर्न इंडियाचें खर्चाचें प्रमाण अत्यंत अल्प आहे, हें तिला अभिमानास्पद आहे. अहवालाचे वर्षी कंपनीनें ५½ लक्ष रुपये खर्चून मुंबई येथें कोटांत फिरोजशहा मेथा रोडवर स्वतःची इमारत उभारली, त्याची हकीकत "अर्था"त येऊन गेलेलीच आहे. ह्या इमारतीचें—"वेस्टर्न इंडिया हौस"—चें उद्घाटन ता. १० एप्रिल रोजीं शेठ घनःश्यामदास बिर्ला ह्यांचे हस्तें झालें. कंपनीनें मुंबई, महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रांत आणि वऱ्हाड, मध्य हिंदुस्थान, गुजरात, संयुक्त प्रांत, पंजाब, सिंध आणि मद्रास ह्या विभागांकरितां स्थानिक सल्लागार मंडळें नेमलीं असून त्यांत नामवंत आणि वजनदार पुढाऱ्यांचा समावेश केलेला आहे. ह्यावरून, वेस्टर्न इंडियाच्या व्यवहार क्षेत्राच्या व्यापाची कल्पना येईल. वेस्टर्न इंडिया विमा कंपनीनें हिंदी कंपन्यांत मिळविलेली सन्मानाची जागा भूषणप्रद आहे. पद्धतशीर प्रगति, सावधगिरीचें धोरण, काटकसरी कारभार, मजबुतीकडे कटाक्ष, विमेदारांची निवड, रकमा किफायतशीर गुंतविण्याची हातोटी, इत्यादि सर्व बाबतींत ती अग्रेसर आहे. पुढील वर्षी तिच्या स्थापनेस २५ वर्षें पुरीं होतील. कंपनीची अशीच अखंड भरभाट होत राहील, ह्यास वरील वृत्तांत हा पुरेसा दाखला आहे. कंपनी आज अनेक वर्षे त्रैवार्षिक दर हजारी ६० व ७५ रुपये ह्या दरानें विमेदारांस बोनस वाटत आहे. येत्या वर्षअखेर कंपनीचें मूल्यमापन आणि रौप्यमहोत्सव होणार आहे.

एकाच वेळीं ६१ संप चालू

नोव्हेंबर, १९३७ मधील एका आठवड्यांत हिंदुस्थानांतील ६१ कारखान्यांत एकाच वेळीं संप चालू होते. एकाच समयीं इतके संप ह्यापूर्वी कधींच चालू नव्हते.

Invest and earn a decent margin of Cumulative Income.

THE SOUND BANKING CORPORATION LTD.

(Estd : 1935)

Head Office:—LAXMI ROAD, POONA.

Pay Rs. 3/12/- and receive Rs. 5/- at the end of 5 years under the Cumulative Deposit Scheme with full freedom to pay and withdraw in between.

For particulars, Apply to:—

Managing Agents.

स्फुट विचार

शिक्षणतज्ज्ञ विलायतेंतून येणार !

आपल्या हाताखालच्या मोठ्या पगाराच्या आणि जबाबदारीच्या जागांवर ब्रिटिश तज्ज्ञांच्या नेमणुका करण्याचा हिंदुस्थान सरकारचा क्रम अव्याहत चालू आहे. हिंदुस्थानांत लायक माणसें मिळण्यासारखीं असतां त्यांस बाजूला सारून ब्रिटिशांची भरती करण्याच्या ह्या धोरणाविरुद्ध हिन्दी लोकमत स्पष्टपणानें व्यक्त करण्यांत आलें असूनहि सरकारच्या येरे माझ्या मागल्यास आळा बसत नाहीं. ज्या प्रकारची लायकी ह्या देशांत अनुभवाच्या किंवा ज्ञानाच्या अभावीं सापडणें शक्य नाहीं त्या लायकीकरतां आमच्या सरकारास विलायती तज्ज्ञाची आयात करावी लागली तर त्यास कोणी दोष देणार नाहीं. ती गोष्ट अपरिहार्य आणि इष्ट अशी मानण्यांत येईल. हिंदुस्थान सरकारच्या कारभारांत सेंट्रल एज्युकेशन बोर्ड ह्या नांवाचें मंडळ आहे आणि त्याचा उद्देश प्रांतांमधील सरकार व शिक्षणसंस्था ह्यांच्यापुढें येणाऱ्या प्रश्नांचा विचार सहमतानें करणें हा आहे. ह्या मंडळाचा तज्ज्ञ अधिकारी "एज्युकेशनल कमिशनर" हा असतो. त्याच्या जागेवर मि. जॉन सार्जंट ह्या ब्रिटिश शिक्षणतज्ज्ञाची नेमणूक करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरवलें आहे. लोकमत ह्या नेमणुकीस प्रतिकूल आहे हें उघड असल्यानें तिचें समर्थन करण्याचा प्रयत्न होत आहे तो सर्वथा हास्यास्पद आहे हें सांगावयास नको. प्रांतिक प्रधानमंडळांच्या पुढें अनेक बिकट शिक्षणविषयक प्रश्न आहेत आणि ते सोडवण्याच्या कामीं विलायतेंतल्या ताज्या अनुभवाच्या तज्ज्ञाचें उपयुक्त सहाय होईल ही कल्पना खुळचटपणाची आहे. हिंदुस्थानांतली परिस्थिति आणि येथील अडचणी व गरजा ह्यांची यथातथ्य माहिती होण्यापूर्वीच विलायती तज्ज्ञाच्या नेमणुकीची मुदत संपून जावयाची. हिंदुस्थानच्या खर्चानें हे तज्ज्ञ तयार होणार आणि मग आम्हांस सल्ला देणार ! ज्यास आमच्या प्रश्नांची माहिती नाहीं असा तज्ज्ञ हिंदी प्रधान मंडळें, विद्यापीठें आणि शिक्षणतज्ज्ञ ह्यांस सहाय करणार !

हिंद-ब्रिटन व्यापारी कराराचें भवितव्य

लँकेशायरच्या शिष्टमंडळाचें हिंदी कारखानदारांच्या प्रतिनिधींशीं न जमल्यामुळें तें आलें तसेंच विलायतेस परत गेलें. हिंद-ब्रिटन व्यापारी करारांच्या वाटाघाटींची हालचाल त्यानंतर इंग्लंडमध्यें चालू झाली. ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष, मि. ऑलिव्हर स्टॅन्ले, ह्यांच्यापुढें लँकेशायरच्या लोकांनीं आपली बाजू मांडून हिंदुस्थानांतलीं बोलणीं येथील व्यापाऱ्यांच्या आग्रही वृत्तीमुळें बिघडल्याचा वृत्तांत त्यांस निवेदन केला. हिंदी कपास आणि विलायती कापड ह्यांच्या देवघेवीविषयींच्या परस्पर मान्यतेवर व्यापारी करार अवलंबून ठेवला गेल्या कारणानें, ह्या बाबतींत ऐकमत्य झालेलें नाहीं. तेव्हां ब्रिटिश सरकारनें आतां स्वतःच ह्या प्रश्नाचा शेवट लावावा असें लँकेशायरवाल्यांचें म्हणणें आहे. मि. स्टॅन्ले ह्यांनीं हें सर्व प्रकरण प्रधानमंडळापुढें आपण मांडूं असें त्यांस आश्वासन दिल्याचें कळतें. इकडे, हिंदुस्थान सरकारनें व्यापार मंत्री, सर महमद झाफरुल्लाखान, ह्यांस विलायतेंत पाठवून आपलें म्हणणें तेथील सरकारापुढें मांडण्याची व्यवस्था केली आहे. हिंदुस्थानच्या वतीनें तेथें सरकारशीं वाटाघाटी करून सर महंमद त्यांच्या शेवटच्या अटी घेऊन ऑगस्टमध्यें हिंदुस्थानांत परत येतील. त्यांची पुन्हां हिंदी कारखानदार आणि व्यापारी ह्यांच्याशीं ह्या अटींसंबंधानें चर्चा होईल. नंतर कराराचा मसुदा तयार होऊन तो सहीकरितां लंडनला पाठवण्यांत येईल. हिंद-ब्रिटन व्यापारी कराराबाबतचा पुढचा कार्यक्रम ह्या प्रकारचा आहे. सर महमद झाफरुल्लाखान ह्यांचें वजन ब्रिटिश सरकारावर कितीसें पडतें आणि लँकेशायरवाल्यांस तडजोड करण्यास लावण्याइतका त्यांचा जोर लागतो किंवा नाहीं, ह्यावर कराराचें शेवटचें स्वरूप अवलंबून राहणार आहे. ब्रिटिश प्रधानमंडळानें आपलें मत एकदा बनवलें म्हणजे हिंदुस्थानांतल्या पुढल्या वाटाघाटी निष्फळच होणार. कारण, येथील सरकारास ब्रिटिश प्रधानमंडळाच्या निर्णयापुढें मान वाकवावी लागणारच. हिंदी मध्यवर्ती कायदेमंडळास, प्रतिकूल निर्णय झाल्यास, निषेधापलीकडे कांहीं अधिक करतां येणार नाहीं.

"उलट्या हुंड्या" विकाव्या लागणार कीं काय ?

हिंदुस्थानची परराष्ट्रीय हुंडणावळ खालावली आहे ह्याचें कारण, आयातीपेक्षा निर्गत व्यापार जितक्या प्रमाणांत अधिक असावयास पाहिजे तितक्या प्रमाणांत तो अलीकडे राहिलेला नाहीं, हें होय. परकीय राष्ट्रांचे मालाबद्दलचें आणि व्याज, औद्योगिक नफा, सरकारी नोकरांचीं पेन्शनें इत्यादि बाबतींतलें देणें देण्याचा मार्ग मालाची निर्गत हाच आहे. ही निर्गत एवढ्या मोठ्या किंमतीची असली पाहिजे कीं तिच्यामधून बाहेरचीं सर्व देणीं भागवतां यावीं. परंतु हिंदुस्थानची निर्गत आयातीचे मानानें घटली आहे आणि तिच्यावर निघणाऱ्या हुंड्या अपुऱ्या पडत आहेत. म्हणजे, त्या विकत घेणारांस दर रुपयामागें कमी पेन्स पत्करावे लागत आहेत. ही घट मर्यादेपलीकडे गेली असतां सध्याचा १८ पेन्सांचा मामुली दर टिकवणें कठीण होणार आहे. तो खाली जाऊं न देण्याचें तर सरकारचें धोरण आहे. मग हें जमावयाचें कसें ? विलायतेंत पैसा पाठवूं इच्छिणारांस दर रुपयास १७$\frac{31}{32}$ पेन्सपेक्षां कमी रकम मिळूं लागली असतां हुंडणावळ सपशेल पडली असें होऊन सरकारी धोरण फसणार. तेव्हां, रिझर्व्ह बँकेस हुंडणावळ उचलून धरण्यासाठीं ठराविक दरानें बाजारांत न मिळणाऱ्या विलायतेवरच्या हुंड्या त्याच दरानें नुकसान सोसून विकणें प्राप्त होईल. रिझर्व्ह बँक नेहमीं विलायती हुंड्यांची खरेदीदार असते ती विक्रेती व्हावी लागेल. विलायतेंत तिचा निधी आहे, त्यावर हुंड्या काढून त्या तिला विकाव्या लागतील आणि त्याच निधीमधून सेक्रेटरी ऑफ स्टेटला त्याच्या मामुली खर्चासाठीं हिंदुस्थान सरकाराच्या वतीनें पैसा पुरवावा लागेल. ह्या हुंड्यांसच "उलट्या हुंड्या" म्हणतात. ह्या कामासाठीं भरपूर निधी शिल्लक आहे असें सरकारनें नुकतेंच जाहीर केलें आहे, त्यांतलें इंगित हेंच आहे. उलट्या हुंड्यांचा मार्ग कटु अनुभव आलेला आहे. ह्या दृष्टीनें अशी पाळी रिझर्व्ह बँकेवर येणें श्रेयस्कर नाहीं. व्यापाराचा आणि परराष्ट्रीय देण्याघेण्याचा ओघच बदलला असतां हुंडणावळीच्या सध्याच्या धोरणास चिकटून रहाण्याचा आग्रह धरण्याऐवजी सरकारनें ह्या सर्व प्रश्नाचा व्यापक दृष्टीनें विचार करण्यास लागावें, हें बरें नाहीं काय ?

नवीन विमा कायदा—श्री. जमनादास ह्यांची टीका

एशियन विमा कंपनीच्या भागीदारांची साधारण सभा नुकतीच भरली होती, त्या वेळीं कंपनीचे अध्यक्ष, श्री. जमनादास

मेहता, ह्यांनीं आपल्या भाषणांत नवीन विमा कायद्यांतील दोष-स्थळांचें विवेचन केलें. हिंदी विमा कंपन्यांस पुरेसें संरक्षण देण्यांत आलेलें नाहीं आणि त्याच प्रमाणें हिंदी कंपन्यांतील परस्पर स्पर्धा थांबेल व त्यांस कमी खर्चांत काम मिळवितां येईल, अशी योजना कायद्यांत नाहीं, असें त्यांनीं सांगितलें. एजंटांचे कमिशन नियंत्रित केलें असलें तरी चीफ एजन्सीच्या पद्धतीस हात लावण्यांत आलेला नाहीं आणि त्यामुळें अनिष्ट स्पर्धेस वाव राहिलेला आहे; तसेंच कायद्यानें कंपन्यांचा कारभार ज्यास्त खर्चाचा केला आहे, असे ते म्हणाले. कंपनीच्या विमा खातीं फंडापैकीं शेकडा ५५ इतकी रकम सरकारी रोख्यांत गुंतविणें बंधनकारक केल्यामुळें कंपनीचें उत्पन्न घटेल आणि त्याचा परिणाम विमेदारांचे बोनसवर अनिष्ट होईल, हा त्यांचा मुद्दा विशेष चिंतनीय आहे. कंपन्यांची बळकटी वाढविली पाहिजे हें खरें असलें तरी विमा खातीं फंडाचा एवढा मोठा भाग कमी दरानें गुंतविल्यानें विमेदारांचें नुकसान होईल, हें उघड आहे. बोनस हा विमेदारांचा अपेक्षित फायदा नव्हे असें ह्यावर म्हणतां येईल; तथापि एकाद्या गोष्टीविषयीं विशेष दक्षता बाळगली असतां त्या बाबतींतली उपाययोजना जरूरीपेक्षां ज्यास्त कडक आणि निष्कारण जाचक होण्याची भीति असते हें लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. विमा कंपन्यांच्या व्यवहारांवरील नियोजित नियंत्रणाचे बाबतींत असाच प्रकार होणें सहाजिक आहे. विमा कंपन्यांच्या मूल्यमापनांतील वाढाव्यावर प्राप्तीवरील कर बसविणें योग्य नाहीं, कारण ही रकम विमेदारांचीच असून ती त्यांस परत करावयाची असते; कंपन्यांच्या खऱ्या उत्पन्नावरच कराची आकारणी करणें योग्य आहे, इत्यादि अध्यक्षांच्या भाषणांतील इतर मुद्देहि विमेदारांच्या हिताचे दृष्टीनें महत्त्वाचे आहेत.

व्यापारवृद्धि कमिटी

कोल्हापुरचे छत्रपति महाराज ह्यांनीं व्यापारवृद्धीकरितां रावबहादुर डॉ. पी. सी. पाटील ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली आहे. कमिटीनें आपली प्रश्नमालिका तयार केली असून व्यापारवृद्धीचे कामीं लक्ष घालणाऱ्या सद्गृहस्थांकडून उत्तरें मागविण्यांत आलीं आहेत.

सुताचा नंबर

एक पौंड सुताच्या, प्रत्येकीं ८४० वारांच्या किती लडी बनतात, त्यावर सुताचा नंबर अवलंबून असतो. जितक्या लडी, तो सुताचा नंबर, असें समजतात. भारी नंबराचें सुत तलम असतें, हें उघड आहे. २४ नंबरापर्यंतचें सूत 'हलकें' समजलें जातें. ३०० नंबराचेहि पुढें सुताचे नंबर असूं शकतात.

मार्क्स अँन्ड स्पेन्सर

मार्क्स अँन्ड स्पेन्सर ह्या ब्रिटिश कंपनीचे एकूण २२८ स्टोअर्स आहेत. चालू वर्षी ११ नवीन स्टोअर्स बांधण्यांत येणार आहेत. तयार मालाच्या उत्पादकांशींच केवळ नव्हे तर त्यांस लागणारा कच्चा माल तयार करणारांशींहि ह्या कंपनीनें संबंध जोडले असल्यामुळें तिला पाहिजे तो माल तत्परतेनें आणि स्वस्त मिळूं शकतो.

सहकारी अर्बन बँका

हिंदुस्थानांतील शेतकी पतपेढ्या विशेष यशस्वी झाल्या नसल्या, तरी अर्बन सहकारी बँकांनीं, विशेषतः मुंबई इलाख्यांत, चांगली प्रगति केली आहे. व्यापारी जॉइंट स्टॉक बँकांप्रमाणेंच त्या आतां बँकिंगचे अनेक व्यवहार करूं लागल्या असून, मध्यम प्रतीच्या गांवांतील लोकांच्या बँकिंगच्या गरजा त्या समाधानकारक रीतीनें भागवीत आहेत. परंतु ह्या त्यांच्या कामांत सहकाराचा भाग मर्यादित होऊं देणें इष्ट नाहीं. त्यांचें कार्यक्षेत्र विस्तार पावत आहे, त्याबरोबरच त्यांच्या चालकांवरील जबाबदारीहि वाढत चालली आहे. सहकारी तत्त्व आणि त्या तत्त्वानुसार करावयाचा बँकिंगचा धंदा ह्याविषयीं अर्बन बँकांच्या चालकांस स्पष्ट कल्पना आल्याविना सहकारी अर्बन बँकांची पद्धतशीर प्रगति होणार नाहीं. मुंबई प्रांतिक सहकारी बँकेचे चीफ अकौंटंट, श्री. ल. के. भागवत, ह्यांनीं "अर्बन बँका" ह्या नांवाचें एक पुस्तक इंग्रजींत लिहून नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे, तें अर्बन बँकांच्या चालकांस मार्गदर्शक होण्याजोगें आहे. श्री. भागवत ह्यांचा सहकारी चळवळीशीं दीर्घ परिचय असून त्यांस सहकारी बँकिंगचा प्रत्यक्ष अनुभव आहे. ह्यामुळें पुस्तकांतील विवेचन अत्यंत व्यवस्थित आणि सुबोध झालें आहे. सहकारी अर्बन बँकिंगच्या व्यवहारांतील खाचाखोचा त्यांनीं मार्मिकपणें समजावून सांगितल्या आहेत. पुस्तकाचे प्रारंभीं सहकारी चळवळीची व्याप्ती, हिंदुस्थानांतील सहकारी सोसायट्यांबाबतचे कायदे, मुंबई सहकारी कायदा व कानू, सहकारी सोसायट्यांची स्थापना, इत्यादि, बाबींविषयीं आवश्यक ती माहिती त्यांनीं दिली आहे. अर्बन बँकांचे विविध प्रकार, त्यांची रचना आणि व्यवस्था, खेळत्या भांडवलाची उभारणी, भांडवल गुंतविण्याचे प्रकार, कर्जाची वसुली आणि लवाद, हिशेब, हुंड्यांचा व्यवहार, ताळेबंद, हिशेब तपासणी, सहकारी चळवळीचीं प्रमुख अंगें, इत्यादि प्रकरणांत लेखकानें तपशीलवार आणि जरूर तेथें कोष्टकें व तक्ते देऊन सहकारी अर्बन बँकिंगच्या व्यवहारांची उत्कृष्ट माहिती दिली आहे. इतके विषय संगतवार एकत्र आणून आणि सहकारी अर्बन बँकिंगच्या पद्धतीचें सुबोध विवरण करून लेखकानें अत्यंत उपयुक्त कामगिरी बजावली आहे.

श्री. भागवत हे आज कित्येक वर्षें प्रांतिक सहकारी बँकेंत मोठ्या जबाबदारीचीं कामें करीत आहेत. त्यांच्या परिपक्व अनुभवाचें सार वरील पुस्तकांत उतरलें आहे. बँकिंग व सहकार ह्या विषयांच्या अभ्यासकांस, सहकारी अर्बन बँकांच्या चालकांस आणि त्या बँकिंगमध्यें हितसंबंध असणाऱ्या सहकारी जनतेस हें पुस्तक बहुमोल वाटेल, ह्यांत संशय नाहीं. पुस्तकास पंजाब नॅशनल बँक लि. चे जनरल मॅनेजर, आणि मुंबईच्या व्यापारी कॉलेजचे माजी प्रिन्सिपॉल, श्री. एम. एल. टॅनन, ह्यांनीं प्रस्तावना लिहिली आहे. पृ. सं. १७०. किंमत २ रु.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें.

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

त्रावणकोर नॅशनल अँड क्विलॉन बँकेचे व्यवहार तात्पुरते बंद

दि त्रावणकोर नॅशनल ॲन्ड क्विलॉन बँकेनें मंगळवार, ता. २१ रोजीं आपल्या सर्व शाखांचा आणि मुख्य कचेरीचा व्यवहार १ जुलै पर्यंत तहकूब केल्याचें जाहीर केलें आणि त्याप्रमाणें बँकेच्या सर्व कचेऱ्यांवर नोटीस लावण्यांत आली. त्रावणकोर नॅशनल बँकेची स्थापना १९१२ सालीं झाली आणि तिच्यांत क्विलॉन बँक ऑक्टोबर, १९३७ मध्यें सामील करण्यांत आली. सबंद हिंदुस्थानांत आणि सिलोनांत मिळून बँकेच्या सुमारें ८० शाखा आहेत. तिचें खेळतें भांडवल ४½ कोटि रुपये आहे. बँकेचा व्यवहार कायमचा गुंडाळण्यांत यावा, अशा आशयाचा एक अर्ज एका ठेवीदारानें मुंबई हायकोर्टांत दाखल केला, त्याची सुनावणी ता. ११ जुलै रोजीं होणार आहे. इतरहि कांहीं ठिकाणच्या ठेवीदारांनीं तेथील कोर्टांत असेच अर्ज केले आहेत. त्रावणकोर नॅशनल ॲन्ड क्विलॉन बँकेस आपले व्यवहार कां तहकूब करावे लागले, ह्याविषयींची विश्वसनीय माहिती उपलब्ध नाहीं. रिझर्व्ह बँकेस जोडलेल्या शेड्यूल्ड बँकेवर कामकाज तात्पुरतें बंद करण्याची पाळी आली असल्यानें ह्या बाबतींतली लोकांची जिज्ञासा वाढणें स्वाभाविक आहे. बँकेनें हिंदुस्थान सरकारकडे मदतीची विनंति केली असून, बँकेविरुद्ध करण्यांत आलेल्या प्रचाराविषयीं चौकशी करण्यासाठी सरकारनें चौकशी कमिटी नेमावी असें सुचविलें असल्याचें प्रसिद्ध झालें आहे. बँकेची पुनर्रचना केल्याखेरीज भागणार नाहीं असें बँकेनें त्रावणकोर संस्थानास कळविलें आहे आणि बँकेची मालमत्ता आणि येणीं-देणीं स्वतः ताब्यांत घेण्याविषयीं त्यास विनंति केली आहे अशीहि बातमी वृत्तपत्रांत आली आहे. प्रस्तुत प्रकरणांत विश्वसनीय व तपशीलवार माहिती प्रसिद्ध होणें अगत्याचें आहे.

ब्रिटिश कापडाची निर्गत मंदावली

ग्रेटब्रिटनमधून निर्गत होणाऱ्या मालाचे यादींत किंमतीच्या दृष्टीनें अग्रेसरत्वाचा मान आजवर कपास-कापडास होता. १९३८ च्या पहिल्या तिमाहींत झालेल्या निर्गतीमध्यें यंत्रसामुग्रीनें ती जागा प्रथमच पटकावली. ही निर्गत शेतीप्रधान देशांकडेच झाली असल्यानें ब्रिटिश कापडाचें गिऱ्हाइक त्यामुळें कमी होईल, हें उघड आहे. प्रत्येक देश स्वतःचे कापड-कारखाने उभारीत असून त्यांस संरक्षण देत आहे. ग्रेटब्रिटननें प्रमुख देशांशीं व्यापारी करार करावे आणि ब्रिटिश कापडाची त्यांतील किमान निर्गत निश्चित करून घ्यावी अशी लँकेशायरच्या कारखानदारांची खटपट आहे. हे करार दीर्घ मुदतीचे असावेत, असाहि त्यांचा आग्रह आहे. करार करणाऱ्या दुसऱ्या पक्षास ह्या अटी मान्य व्हाव्यात, ह्याकरितां ग्रेट ब्रिटन त्यांस कोणत्या सवलती देणार, तें मात्र स्पष्ट दिसत नाहीं.

१९३७ सालांतील संप

संबंद हिंदुस्थानांत मिळून, १९३७ सालीं, एकूण ३७९ औद्योगिक संप झाले. १९३६ च्या मानानें हा आकडा दुपटीपेक्षा मोठा आहे. १९२१ सालीं ३९६ संप झाले होते. १९३७ सालीं एकूण ६ लक्ष, ४८ हजार कामगारांचे ८९ लक्ष, ८२ हजार कामाचे दिवस बुडाले.

बंगाल, मुंबई आणि संयुक्त प्रांत येथेंच संपाचा उद्भव विशेष झाला. शेकडा ४५·९ वांध्यांचा निकाल कामगारांस अनुकूल असा झाला. १९३७ सालीं हिंदी कारखान्यांत झालेल्या संपांपैकीं शेकडा ५८·३ संप तागाच्या आणि कपास कापडाच्या गिरण्यांत झाले आणि सामील कामगारांपैकीं ८२·२ इतके मजूर ह्या गिरण्यांतील होते.

मराठी केन्द्र संस्था, पुणें

उन्हाळ्यानंतर १५ जून रोजीं सुरू झाली. यंदापासून मॅट्रिक नापास आणि नोकरी करूं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां बँकिंग आणि अकौंटन्सी या विषयांचे डिप्लोमा अभ्यासक्रम सुरू केले आहेत. शिक्षक वर्ग पदवीधर व अनुभवी असा असून परगांवचे विद्यार्थ्यांना वसतिगृहाची सुंदर सोय केली आहे. जास्त माहितीकरितां माहितीपत्रक मागवा.

आचार्य,
मराठी केन्द्र संस्था.
२९२ सदाशिव पेठ, पुणें.

प्रत्यक्ष शिक्षणाच्या सर्व सोयी असलेलें, आयुर्वेदाचें उच्च शिक्षण देणारें

आयुर्वेद महा-विद्यालय, पुणें

नवीन अधिवेशन ता. १६ जून पासून स्वतःच्या नवीन इमारतींत सुरू. मॅट्रिक पास असलेल्यांना प्रवेश मिळेल. अभ्यासक्रम चार वर्षांचा. संपूर्ण आयुर्वेदाच्या शिक्षणाबरोबर पाश्चात्य वैद्यकाचेंही शिक्षण मिळतें.

प्रत्यक्ष शिक्षणाच्या संस्था:

ता. रा. ध. आयुर्वेदिक हॉस्पिटलः—या हॉस्पिटलमध्यें ४० राहत्या रोग्यांची सोय असून बाहेरून औषधास येणाऱ्या रोग्यांची संख्या २५० रोजच्यावर असते. शस्त्रकर्माची उत्कृष्ट सोय असून दरसाल ५०० च्या वर शस्त्रकर्में होतात. सर्व मुंबई इलाख्यांत हें एकच समृद्ध व नमुनेदार आयुर्वेदीय रुग्णालय असून त्यामध्यें विद्यार्थ्यांच्या रोगनिदान, चिकित्सा व शस्त्रक्रिया या विषयांच्या प्रत्यक्ष शिक्षणाची चांगली सोय आहे.

सूतिकागृहः—हें सर्व सोयींनीं समृद्ध असें बांधलें असून यामध्यें दहा सूतिकांची सोय केली आहे. यामुळें प्रसूतिकर्माच्या प्रत्यक्ष शिक्षणाची चांगली सोय झाली आहे.

आयुर्वेद रसशाला पुणें, लि०:—हा कारखाना लिमिटेड केला असून शास्त्रोक्त पद्धतीनें औषधें तयार करण्याचें काम त्यांत मोठ्या प्रमाणावर चालतें. यामध्यें विद्यार्थ्यांना औषधें तयार करण्याचें शिक्षण देण्याची स्वतंत्र व्यवस्था केली आहे.

शवच्छेदनशाला:—यामध्यें शवविच्छेदनाचें शिक्षण स्वतंत्र तज्ज्ञांकडून दिलें जातें. याशिवाय प्रयोगशाला, वस्तुसंग्रह, ग्रंथालय इत्यादि सर्व सोयी आहेत.

प्रत्यक्ष शिक्षणाच्या इतक्या उत्तम सोयी अखिल महाराष्ट्रांत या एकाच आयुर्वेद महाविद्यालयांत आहेत. सविस्तर माहितीसाठीं ८= चीं तिकिटें पाठवावीत.

पत्ता:—आयुर्वेद महाविद्यालय, निहालपेठ, पुणें २.

पु. ग. नानल, अधिपति.

योजनात्मक आर्थिक धोरण

पाटणा युनिव्हर्सिटींतील प्रोफेसर आणि इंडियन इकॉनॉमिक असोसिएशनचे चालू वर्षाचे अध्यक्ष, डॉ. ग्यानचंद, ह्यांचें "हिंदुस्थानांत योजनात्मक आर्थिक धोरणाची शक्यता" ह्या विषयावर पुणें येथें गेल्या सोमवारीं गोखले इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें व्याख्यान झालें. हिंदुस्थान सरकारचे माजी फडनवीस आर्थिक योजना आखण्याचें धोरण पुरस्कारीत होते, परंतु सध्याचे फडनवीस सर जेम्स ग्रिग हे खुल्या व्यापारी तत्त्वाचे पुरस्कर्ते असल्याचें त्यांनीं सांगितलें. ह्यामुळें हिंदुस्थान सरकारच्या आर्थिक तज्ज्ञ सल्लागाराची निवड योजनात्मक आर्थिक धोरणाचे विरोधकांतूनच झालेली आहे. आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्ट निश्चित केल्यावांचून धोरणाचा तपशील ठरवितां येणार नाहीं आणि अशा ध्येयासंबंधीं हिंदुस्थानांत मुळींच एकवाक्यता नाहीं, असें ते म्हणाले. प्रांतिक स्वायत्त सरकारांस कांहीं किरकोळ बाबतींत कार्यक्रम आखतां आला, तरी व्यापक आर्थिक योजनांचें संघटन त्यांस साध्य होणार नाहीं, असा अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला. आर्थिक योजना पार पाडण्यास आवश्यक असलेली सत्ता लोकांच्या हातीं नसल्यानें आणि आंतरराष्ट्रीय आर्थिक परिस्थितीचा उपद्रव हिंदुस्थानास पोचूं नये, अशी व्यवस्था करणें आपल्या शक्तीबाहेरचें असल्यानें, योजना ठरविली तरी ती व्यवहारांत उतरवितां येणें कठीण आहे, असें मत त्यांनीं दिलें. हिंदी संस्थानांचा सवता सुभा, ही मार्गांतली आणखी एक अडचण आहे, असें ते म्हणाले थोडक्यांत म्हणजे, मोठ्या प्रमाणावर योजनात्मक आर्थिक धोरणाची शक्यता हिंदुस्थानांत आजच्या परिस्थितींत मुळींच नाहीं, असा ठाम सिद्धांत त्यांनीं पुढें मांडला. अध्यक्ष, पंडित हृदयनाथ कुंझरू, ह्यांनीं डॉ. ग्यानचंद ह्यांचे आभार मानले.

मुंबईंत डिव्हिजनल सहकारी परिषद

मुंबई शहर आणि उपनगर ह्यांमधील सहकारी बँका व सोसायट्या ह्यांची परिषद बॉंबे डिव्हिजनल इन्स्टिट्यूटच्या विद्यमानें गेल्या रविवारीं प्रॉ. कोऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटच्या दिवाणखान्यांत भरली होती. परिषदेचें अध्यक्षस्थान ना. रामदास पंटलू ह्यांनीं मंडित केलें होतें. बॉंबे डिव्हिजनल को. इन्स्टिट्यूटचे चेअरमन, श्री. माधवलाल भट्ट ह्यांनीं स्वागतपर भाषण केल्यानंतर मि. एफ. स्टोन्स, ई. डी. ससून ॲन्ड कं. लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर, ह्यांनीं परिषदेचें उद्घाटन केलें. श्री. रामदास पंटलू ह्यांनीं रीऑर्गनायझेशन कमिटीनें सुचविलेल्या सुधारणा-योजनांस तत्त्वतः सर्वसाधारणपणें पाठिंबा दिला. मुंबईमधील हौसिंग सोसायट्यांचे व्याजाचे दर उतरविणें आणि कर्जाच्या परतफेडीची मुदत वाढविणें आवश्यक आहे, असें ते म्हणाले. सहकारी विमा सोसायट्यांनीं आपलें व्यवहारक्षेत्र प्रांताबाहेर वाढविण्यास हरकत नसावी असें मत त्यांनीं व्यक्त केलें. मजूर संघांचें कार्य सहकारी चळवळीचे कक्षेंत आणलें पाहिजे, असें त्यांनीं सुचविलें.

मुंबई सरकारनें प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटच्या घटनेंत दुरुस्ती करण्याचें योजिलें आहे. "ही योजना लोकशाहीचे तत्त्वाविरुद्ध असल्यानें आणि त्या योजनेमुळें इन्स्टिट्यूटचें विशिष्ट स्थान नाहींसें होणार असल्यानें, सरकारनें आपल्या योजनेचा फेरविचार अवश्य करावा" असा ठराव परिषदेनें मान्य केला आणि आपला अखेरचा निर्णय जाहीर करण्यापूर्वी सरकारनें सहकारी कार्यकर्त्यांची एक परिषद बोलवावी अशी सरकारास विनंति करण्यांत आली.

अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें १
[माहितीपत्रक मागवा]

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण
संगीत-मार्गदर्शक
मालेचीं पुस्तकें.
गायन किं. ६ आ. हार्मोनियम किं. २॥ रु. दिलरुबा किं. १ रु. २ आ. फिडल् किं. १ रु. ४ आ.
व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.
प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व बर्फी वापरा
मोती चौक : : : सातारा

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.

पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,
रंगीत कापडाचे व चिटाचे व्यापारी.
एरोमाफ प्रिंटिंग, खडीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.
भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ६१५ सदाशिव पेठ.

'अभिनंदनीय प्रगति' असेंच बोल नाशिकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधी व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेंत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.
लिहा अगर भेटा. | मॅनेजिंग डायरेक्टर

सर्वांगीण उत्कर्ष

सन १९३७

भरभक्कम यशाचें व प्रगतीचें वर्ष.

वेस्टर्न इंडिया

लाइफ इन्शुअरन्स कंपनी लिमिटेड, सातारा-सिटी.

विमाक्षेत्रांत सांप्रत चालू असलेली घातकी स्वरूपाची चढाओढ आणि ठेवी बाजारांतील मंदी यांना न जुमानतां या भरीव स्वदेशी विमा कंपनीनें पुढील यशोनिदर्शक गोष्टी या वर्षी संपादन केल्या आहेत.

१ शेंकडा २६·३ पासून २४·८ पर्यंत खालीं आलेलें खर्चाचें प्रमाण.
२ ठेवींवर शेंकडा ५·६ इतकें भरपूर व्याज.
३ विमापत्राच्या सरासरी रकमेंत वाढ.
४ रद्द होणाऱ्या विम्याचें कायम राहिलेलें अत्यल्प प्रमाण.
५ लाइफ फंडामध्यें रु. ११,७५,६६४-१०-११ ची पडलेली भर आणि त्यामुळें एकूण रु. ८२,४४,६६१-१२-६ चा बनलेला लाइफ फंड.
६ बाजार भावानें झालेली ठेवींच्या किंमतींत मोठी वाढ आणि तिच्या जोडीला ६॥ लाखांची गंगाजळी.
७ एकूण चालू विम्याच्या रकमेंत ३ कोटी २० लाखांवरून ३ कोटी ७५ लाखांवर झालेली मोठी वाढ.
८ मुंबईच्या विमा रस्त्यावर उभारलेलें कंपनीचें भव्य "वेस्टर्न इंडिया हाऊस."

याशिवाय कंपनीनें गेल्या तीन मूल्यमापनांत चालू ठेवलेलें जास्तींत जास्त

त्रैवार्षिक दर हजारीं

रु. ७५ हयातीनंतर

बोनस

रु. ६० हयातींतील

कोणत्याहि बाजूनें पहा, वेस्टर्न इंडिया विमा कंपनी ठसठशीतपणें तुमच्या डोळ्यांत भरेल.

— आठवें मूल्यमापन आणि रौप्यमहोत्सव चालू वर्ष असेर —

मॅनेजर,
हेड ऑफिस.

पुणें शाखा : : : : लक्ष्मी रोड, पुणें

व्यापारी व्यवहारांतील वाढावा आणि कसर

—०⊙०—

दुकानदार किंवा लहान-मोठे व्यापारी ह्यांचेकडून माल विकत घेतांना ठराविक वजनाच्या मापापेक्षां थोडाबहुत अधिक माल मागून घेण्याचा गिऱ्हाइकांचा रिवाज हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे. गवताची पेंढी, पसाभर धान्य, लांकडाचा ओंडा, दुधाची धार, तेलाची पळी, गुळाचा लहान खडा इत्यादि जिन्नस गिऱ्हाइकास जादा देऊन त्यास संतुष्ट ठेवण्याची दुकानदारांची रीत आहे. "वर कांहीं तरी टाकण्याचा" हा विक्रेत्यांचा प्रघात सर्व प्रकारांच्या देवघेवींत आढळतो आणि त्यांत जादा कांहीं तरी मिळवावयाचा आपणांस कायमचा हक्क आहे असें खरेदीदारांस वाटतें. वाण्याच्या दुकानांत एक आण्याचे जिन्नस विकत घेणारी बाई मुलासाठी "बाईच गूळ" तरी मागून घेईलच. हा रोजचा व्यवहार असल्यानें त्याचें कोणास कांहीं विशेष वाटत नाहीं. दुकानदारहि आपल्या तराजूचा काटा गिऱ्हाइकाच्या बाजूस झुकतो आहे, असें दाखवल्यावांचून रहात नाहीं. ह्या व्यवहारांत दोन्ही बाजू खुष असतात आणि एकाचें नुकसान झालें आहे असें कोणासच वाटत नाहीं. परंतु भाव निश्चून ठरले आणि वजन-माप काटेकोरपणानें झालें असतां मोठ्या प्रमाणावरील व्यवहारांत मालाच्या मालकास चाट बसल्याची जाणीव होते आणि तो वरील प्रघाताविरुद्ध तक्रार करूं लागतो. थोडें, थोडें म्हटलें तरी उत्पादकास एकूण व्यवहारांत पुष्कळच गमवावें लागतें आणि खरेदीदार तर हा आपला निश्चित हक्क आहे असें समजतात. मालाचें वजन-माप आणि बाजारभाव ह्यांचे बाबतींत ढिलाई असली म्हणजे तर शेतकऱ्यांसारख्या उत्पादकांस फार तोशीस पोहोचते. खरेदीदार संघटित आणि सामर्थ्यवान असतात आणि विक्रेत्यांचें त्यांच्यापुढें कांहीं चालत नाहीं.

व्यापार मोठ्या प्रमाणावर चालून त्यांत काटेकोरपणा आणि नियमबद्धता असूनहि पाश्चात्य देशांत असे प्रकार घडत असलेले आढळतात ह्याचें एक ताजें उदाहरण येथें देण्याजोगें आहे. ब्रॅडफोर्ड ह्या नांवाच्या ब्रिटिश शहरांत लोकरीचा मोठा बाजार असून तेथें ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड वगैरे देशांतून येणाऱ्या लोकरीची विक्री होत असते. दर हंड्रेडवेट वजनाच्या लोकरीवर एक पौंड लोकर जादा देण्याची उत्पादकांची वहिवाट त्या बाजारांत अनेक वर्षें चालू आहे. मागें जेव्हां वजनें खात्रीचीं नसत तेव्हां हा वाढावा समर्थनीय होता असें म्हणतां येईल. पण आतां वजन काटेकोरपणानें होत असल्यानें ही वहिवाट बंद व्हावी असा लोकरीच्या विक्रेत्यांचा आग्रह आहे. खरेदीदारांस सदरहू मागणी अर्थातच मान्य नाहीं, आणि बहुमताचा जोर असेल आणि आंतरराष्ट्रीय व्यापारीसंघ व जपान ह्यांचा पाठिंबा मिळेल तर लोकरीच्या खरेदी-विक्रीवर बहिष्कार घालण्याची भाषा ते बोलत आहेत. चालू महिन्याच्या अखेरीस प्रस्तुत कसरीचा प्रघात कायद्यानें बंद होणार असल्याचें समजतें. ह्यांत नफा-नुकसान किती आहे ह्याची कल्पना कांहीं आकडे दिले असतां सहज येईल. गेल्या मोसमांत ऑस्ट्रेलियन लोकरीची ग्रेटब्रिटनमधील आयात ७० लक्ष हंड्रेडवेट भरली आणि तिच्या वरची कसर ७० लक्ष पौंड झाली. न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका ह्या देशांतली लोकर ४५ लक्ष हंड्रेडवेट भरली. दर पौंडास एक शिलिंग ह्या भावानें हिशेब केला असतां एकूण कसरीची किंमत गेल्या वर्षी ६५ लक्ष रुपये झाली. आपणांस मिळणारा वाढावा काढून टाकण्यांत आल्यास आपण विकत घ्यावयाच्या लोकरीची किंमत कमी करूं आणि ह्या योगानें कसरीच्या मानानें विक्रेत्यांस अधिक नुकसान लागेल असें खरेदीदारांचें म्हणणें आहे. ब्रॅडफोर्ड येथील लोकरीचे व्यापारी दर वर्षी २७० कोटि रुपयांच्या मालाची उलाढाल करतात, ह्यावरून सदरहू व्यापार केवढ्या मोठ्या प्रमाणावर चालतो ह्याची कल्पना येईल.

पर्शियन विमा कं. लि.

३१ डिसेंबर, १९३७ अखेर संपलेल्या वर्षी वरील कंपनीनें एकूण ७३ लक्ष रुपये किंमतीच्या ५,६८६ विमा पॉलिसी दिल्या. साल अखेर कंपनीकडे ३ कोटि, ३६ लक्ष रुपयांचे २१,२२९ विमे चालू आहेत. १९३७मध्यें कंपनीस हप्त्यांचे रूपानें १७लक्ष ४९ हजार रुपये मिळाले. वर्षअखेर विमा खातीं फंडांत ५७ लक्ष ११ हजार रुपये आहेत. कंपनीच्या भागीदारांची सभा नुकतीच भरली, त्या वेळीं भागीदारांस ६½% दरानें डिव्हिडंड मंजूर झालें.

दे. भ. लोकनायक माधव श्रीहरी अणे व नामांकित व्यवहारपटु डायरेक्टर असलेल्या एका सुप्रसिद्ध विमा कंपनीकरितां महाराष्ट्र, कर्नाटक आणि गोमांतक प्रांतांत विमा शास्त्राचा पूर्ण अनुभव असलेल्या गृहस्थांना भरपूर पगार व कमिशनवर नेमणें आहे.

दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

(हेड ऑफिस : जळगांव)

माहिती मागवा

चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, गणपती चौक, पुणें २

आकडेशास्त्रज्ञांचें समाधान झालें !

आंकडेशास्त्रज्ञांनीं सर्व तऱ्हेनें हिशेब करून अखेर हीच पॉलिसी पसंत केली.

भरलेल्या हप्त्यावर शेंकडा ९ टक्के व्याज मिळून नफा व नगद ४०० रुपये प्रत्येक हजाराच्या पॉलिसीला देण्यांत येतात.

माहिती मागवा.

दि युनिव्हर्सल विमा कं. लि. चे महाराष्ट्राचे मुख्य एजंट्स : एस्. सूर्यराव ॲन्ड कं., लक्ष्मी रोड, पुणें २

स्टॉक एक्सचेंजच्या सभासदांची संख्या कमी होणार

मुंबई येथील स्टॉक एक्सचेंजच्या सभासदांची (दलालांची) संख्या तेथील व्यवहाराचे मानानें फार मोठी आहे, अशी बरीच जुनी तक्रार आहे. १९०९ मध्यें ह्या संस्थेचे एकूण ३०० सभासद होते, महायुद्धाचे काळांत ही संख्या ३६० झाली आणि १९२० मध्यें ती ४७८ पर्यंत गेली ती अद्याप कायम आहे. त्या वेळच्या मोठ्या व्यापारी उलाढालींमुळें रोखे बाजारांतील कारभारांत बरीच वाढ झाली आणि सर्व सभासदांस भरपूर काम मिळालें. पुढें ही लाट उतरली तरी सभासदांची संख्या मात्र कायम राहिली आणि त्यांपैकीं निम्म्यांस पुरेल, इतकेहि व्यवहार होईनासे झाल्यामुळें सभासद स्वतःच आपल्यातर्फे खरेदी-विक्रीचे व्यवहार करूं लागले. ही अनिष्ट प्रथा थांबविण्याची आज कित्येक वर्षे खटपट चालू आहे. न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंजमध्येंहि अशीच परिस्थिति निर्माण झाली आहे. तेथील सभासदांची संख्या १,३७५ आहे, ती १,००० पर्यंत खाली आणण्याचा यत्न चालू आहे. मुंबई नेटिव्ह शेअर अँन्ड स्टॉक्स ब्रोकर्स असोसिएशनची सभा गेल्या आठवड्यांत भरली होती, त्यावेळीं ह्या प्रश्नाची चर्चा झाली आणि ज्या सभासदांस आपलीं देणीं कराराप्रमाणें देतां येणार नाहींत, त्यांचा परवाना अजिबात रद्द करून टाकावा आणि तो नवीन कोणास देऊं नये असें ठरलें. ह्या नियमानें आपोआपच सभासदांची संख्या हळु हळु कमी होत जाईल.

साखरेऐवजी वाळू

विशिष्ट राष्ट्रीय हिताच्या उद्देशानें अंगिकारलेल्या आर्थिक धोरणाचा कित्येक बाबतींत कसा दुरुपयोग केला जातो, ह्याचें एक हास्यास्पद उदाहरण पोलंडमधून होणाऱ्या वाळूच्या निर्गतींत घडलेलें प्रसिद्ध झालें आहे. त्या देशांतून बोर्निओकडे आज कित्येक महिने वाळूचीं पोतीं धाडण्यांत येत असल्याचें नुकतेंच उघडकीस आलें. पोलंडमधून साखर निर्गत करणारांस तेथील सरकार कांहीं रकम मदत म्हणून देतें. साखरेऐवजीं वाळूचीं पोतीं धाडणारांनीं ही रकम आणि त्याबरोबरच किफायतशीरपणें विदेशी माल आणण्यास आवश्यक ते परवानेहि मिळविले. अशा रीतीनें " निर्गत कलेली " साखर स्वदेशांत विकून पुन: ४० टक्के ज्यास्त किंमत त्यांनीं मिळविली, ती वेगळीच. साखर निर्गत करण्याऐवजीं वाळू बाहेर पाठविणें अशा परिस्थितींत कसें किफायतशीर झालें आणि त्याबाबतचें सरकारी धोरण कसें हास्यास्पद ठरलें, हें वरील गोष्टविरून स्पष्ट होतें. स्वस्त दरानें स्वदेशी मालाची निर्गत होण्यास सवलत देणें हा मुळांतला स्तुत्य हेतु होता. व्यापार व स्वदेशी धंदे ह्यांस उत्तेजन देण्याकरितां स्वदेशी माल देशांत महाग व बाहेर स्वस्त विकण्यास परवानगी देण्याचा युरोपांतील सरकारांचा प्रघात आहे. तसेंच, परदेशी मालाच्या आयातीवर हुंडणावळीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें सामान्यतः नियंत्रण असतें तें निर्गत व्यापार करणारांचे बाबतींत सरकार सैल करतें. ह्या दोन्ही सवलतींचा भलताच फायदा स्वार्थी, हिकमती व्यापारी कसा घेतात ह्याचें वरील व्यवहार हें बोधप्रद उदाहरण आहे.

अप्-टु-डेट शिलाई करतां

महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें   १२ तासांत कपडे शिवून मिळतील.   [खादी भांडाराचे माडीवर

पराडकर टेलर्स ॲकॅडिमी

(सिटी पोस्टासमोर पुणें २)

येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

अधिकृत भांडवल १०,००,०००   विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,०००

खपलेलें भांडवल २,३२,०००   वसूल झालेलें भांडवल १,१५,७८०

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक्स काढतां येतात. या बँकेवरील चेक मुंबईला सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि. मार्फत कमिशनशिवाय वसूल केले जातात. बँकेचे नियम, व्याजाचे दर व शेअर-बद्दल बँकेकडे चौकशी करावी.

M. V. GOKHALE,
मॅनेजर.

काकाकुवा मॅन्शन, लक्ष्मीरोड, पुणें २.

पराडकर टेलरिंग ॲकॅडिमी, पुणें २.

शिवणकलेचें शास्त्रोक्त धंदेशिक्षण देणारी संस्था

१९०७ सालीं स्थापन झालेल्या ह्या संस्थेंत शिवणकामाचें व बेत-कामाचें शास्त्रोक्त शिक्षण धंदेवाईक पद्धतीनें दिलें जातें. आजवर शेकडो विद्यार्थी या संस्थेंतून शिकून गांवोगांव उत्तम तऱ्हेनें धंदा करीत आहेत.

धंद्यांतील व्यावहारिकपणा

येथील विद्यार्थ्यांना विशेष फायदा होतो तो म्हणजे या धंद्यांतील व्यावहारिकपणा. या संस्थेच्या सतत ३६ वर्षे चालू असलेल्या टेलरिंग फर्मच्या सहायानें विद्यार्थ्यांना व्यावहारिक दृष्ट्या अत्यंत उपयुक्त असें बेतकाम व शिवणकाम, दुरुस्ती, अप्टुडेट फॅशन्स वगैरेंचें ज्ञान स्वाभाविकच मिळतें व त्या योगें विद्यार्थी केवळ पुस्तकी न बनतां उत्तम टेलर व कटर होतात. कोणतेंहि धंदेशिक्षण धंद्यांतील मुरलेल्या मनुष्याकडून व धंदा चालू असलेल्या ठिकाणीं घेणें जास्त फायद्याचें आहे.

विनाखर्च भरपूर प्रॅक्टीस

शिवाय, दुकानाच्या सहाय्यानें विद्यार्थ्यांना धंद्यास आवश्यक असें भरपूर प्रॅक्टीस विनाखर्च मिळतें. नुसतें तात्त्विक शिक्षण संपतांच बहुतेक विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणें धंदा करणें प्रॅक्टीसच्या अभावीं अशक्य होतें. अशा प्रकारची अडचण या ठिकाणीं संस्थेचें दुकान असल्यामुळें पडत नसून येथील विद्यार्थी लायक धंदेवाईक बनतो.

नोकरी

येथील शिक्षणक्रम पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांस लायकीप्रमाणें संस्थेच्या टेलरिंग फर्ममध्यें नोकरीहि दिली जाते. शिक्षणक्रमानंतर अधिक प्रॅक्टीसची जरूरी असल्यास टेलरिंग फर्ममध्यें कटिंगचें व शिवणकामाचें शिक्षण वाढविण्यासाठी संधि मिळते.

शिवणकलेवर पुस्तकें

येथील चालकांनीं शिवणकलेच्या शास्त्रोक्त अभ्यासानंतर व या धंद्यांतिल दीर्घ अनुभवानंतर अत्यंत उपयुक्त अशीं पुस्तकें लिहिलीं आहेत. ॲकॅडिमीचे संस्थापक श्री. आर. एन. पराडकर (लंडन डिप्लोमा होल्डर) यांनीं लिहिलेलें ‘शिवणकला-शिक्षक’ (भाग १ ते ३) हें ५०० पानें व ५०० आकृत्या असलेलें संपूर्ण माहितीचें पुस्तक या संस्थेंत पाठ्य-पुस्तक (Text Book) म्हणून लावलें आहे. या पुस्तकाची कीर्ति अखिल हिंदुस्थानांत ज्या ज्या ठिकाणीं मराठी भाषा बोलली जाते त्या त्या ठिकाणीं पसरलेली आहे. याशिवाय, शिवणकला प्रवेश, वस्त्रमापन इ० पुस्तकेंहि येथील चालकांनीं लिहिलीं आहेत.

ज्यांना इकडे येऊन शिक्षण घेणें शक्य होत नसेल त्यांना पोस्टानें कटिंगचें शिक्षण देण्याची सोय केली आहे.

हल्लीच्या फॅशनच्या सर्व कपड्यांचे, ब्राऊन पेपरवर, फुलसाइजमध्यें आंखलेले कटिंगचे नमुने पाठविण्याचीहि व्यवस्था केली आहे. किं. ८ आण्यापासून १॥ रु. पर्यंत.

मुदत व फी

शिवणकामाचें व बेतकामाचें संपूर्ण शिक्षण घेण्यास १ वर्ष मुदत लागते. संपूर्ण कोर्सची फी १०० रु. असून इतर लागणाऱ्या सामानास १० रु. पर्यंत खर्च येतो. याव्यतिरिक्त शिक्षण घेण्यास कोणताहि खर्च लागत नाहीं. सुमारें २०० नग शिवण्याइतके सर्व कापड संस्थेमार्फत मोफत पुरविलें जातें.

विद्यार्थ्यांचे सोयीसाठीं थोड्या फीत इतर लहान लहान अभ्यासक्रम ठेवलेले आहेत. त्याचप्रमाणें

स्त्रियांसाठीं स्वतंत्र अभ्यासक्रम

आंखलेला आहे.



श्री. डब्ल्यू. पराडकर, डी. एम्., टी. सी. ए., (लंडन)

जर्निमन टेलरचा व लंडन डिप्लोमा

शिक्षणक्रम पूर्ण झाल्यावर यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचा जर्निमन (पूर्णपणें धंदा शिकलेला) टेलरचा डिप्लोमा देण्यांत येतो. लंडन डिप्लोमाचेंहि शिक्षण या ठिकाणीं दिलें जाऊन संस्थेतर्फे त्या परीक्षेस बसविण्याची व्यवस्था केली जाते.

या संस्थेंतील शिक्षक वर्ग सुविद्य, तज्ज्ञ आणि अनुभविक असून ॲकॅडिमीचे प्रि. श्री. डब्ल्यू. आर. पराडकर, डी. एम. टी. सी. ए. (लंडन) हे आज सतत २०-२५ वर्षें विद्यार्थ्यांना उत्कृष्ट रीतीनें शिक्षण देत आहेत.

संस्थेची इतर माहिती व नियम माहितीपत्रकांत दिले आहेत. महाराष्ट्रांतील जुन्यांतील जुनी व या शास्त्राचे मराठींत ग्रंथ-निर्माण करणारी अशी ही एकच संस्था असल्यानें सर्वांनीं या संस्थेचा अधिकाधिक फायदा घ्यावा.

Very useful for Central and Urban Co-operative Banks and Societies.

" URBAN BANKS "

BY

L. K. BHAGWAT,

Chief Accountant,

Bombay Provincial Co-operative Bank, Ltd.

The book written in English, besides fully describing the structure and functions of all types of Urban Banks, supplies practical hints to actual workers on the proper conduct of their day to day business including maintenance of accounts and records, cheques, endorsements, bills, audit, annual closing &c. **Principal Tannan** remarks in his foreword: "The book will show the reader the way to keep the co-operative house in the order expected of it." Price Rs. 2. Postage extra. Copies can be had from L. K. Bhagwat, Vincent Road, Plot No. 168 A, Dadar, Bombay 14.

निवडक बाजारभाव

बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) ... ३%

सरकारी कर्जरोखे

५% करमाफ लोन (१९४५-५५)	११७-१२
५% (१९३९-४४) लोन	१०३—७
४% १९४३	१०८—६
३½% बिनमुदत	९८-७½
३½% १९४७-५०	१०६—०
२¾% १९४८-५२	१००—४

निमसरकारी रोखे

४% पोर्ट ट्रस्ट (बिगर गॅरंटी व लांब मुदत)	११०—८
४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत)	१०९—८
४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७० वर्षे मुदत)	१०९—८
४% म्हैसूर कर्ज (१९५३-६३)	११२—४
५% म्हैसूर कर्ज (१९५५)	१२४—४

मंडळ्यांचे भाग

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

बँका

बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११%	१४१—०
बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०%	११५—०
सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८%	३०-१०
इंपीरिअल बँक (५००) १२%	१५६१—४
बाँबे प्रॉ. को. बँक (५०) ५%	५८—८
रिझर्व्ह बँक (१००) ३½%	११५—८

रेल्वेज

दौंड-बारामती (१००) ४½%	१०२—०
पाचोरा-जामनेर (१००) ४½%	९६—४
अहमदाबाद प्रांतज (५००) १२½%	९५८-१२
तापी व्हॅली (५००) ७½%	७२७-८

वीज

बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १३%	१२३—७
कराची (१००) ९%	२१०—०
पुणें इलेक्ट्रिक (१००) ९%	१९६—४
टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½%	१३६१—४
आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½%	१४४२—८

जाहीर खबर

ज्यांची एजन्सी रद्द करण्यांत आलेली आहे अशा एजन्टाकडील हिशोब न मिळाल्यामुळें कर्जाची वांटणी ता. १८-७-३८ पर्यंत तहकूब करण्यांत आली आहे; तरी ता. ११-७-३८ पावेतों ज्यांना नवीन सर्टिफिकेट्स खरेदी करणें असेल त्यांना प्रवेश फी मध्यें रु. १ ची सवलत घेऊन रु.२३ मध्यें सर्टिफिकिटें घेतां येतील व ज्यांनीं पूर्ण पैसे भरले नसतील त्यांना ते भरून सर्टिफिकिटें मिळवितां येऊन कर्जाचा फायदाही घेतां येईल.

जनरल मॅनेजर

दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी लि०

हेड ऑफिसः-गिरगांव मुंबई. ब्रँचः-लक्ष्मी रोड, पुणें २.

'यश आलेंच पाहिजे. मग महाराष्ट्रीय कसले ?'

अशा स्वाभिमानी महाराष्ट्रीयांच्या आर्थिक साहाय्यानें सर्व मशिनरी आली, उभारणीला सुरुवात झाली, ५०० एकर उंसाची लागवड करतां आली.

तारीख १० जानेवारी १९३९च्या मकर-संक्रमणाला

बृहन्महाराष्ट्रीय साखर

व

१२५० एकर उंसाची नवी लागवड

यशाला मदत व दरसाल ५॥ टक्के व्याज व दोन वर्षांनीं रक्कम परत. डिपॉझिट रकमा घेण्यास बोर्डानें मंजूरी दिली आहे.

रा. ब. काकासाहेब सहस्रबुद्धे, डॉक्टर रा. ह. भडकमकर M.A., M.D. रा. ब. वि. कृ. झुळपे इंदोर, रा. ब. रावजी जनार्दन भिडे यांच्या अभिप्रायांसह सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेल.

दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें.

२५७ बुधवार पेठ, पुणें २, बेलबागेसमोर.

स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** (आर्तवदोषारि) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठी मुख्य विक्रेतेः—

धी इंडो फॉरिन एजन्सीज. (डिपार्टमेंट नं. ६)

२५३/३ माधव विलास टिळकवाडी पुणें २.

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
V. G. & Sons
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

For All Medicinal Requisites
— TRY —
N. MAHADEV & Co.
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner POONA, 2.

CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its

YEARS OF

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service
HAS CREATED
PUBLIC CONFIDENCE
The following figures will convince you :
NEW BUSINESS
Last year 1936-37
Exceeds
2 CRORES & 82 LAKHS

BONUS
PER THOUSAND PER YEAR
On Endowment **Rs. 23** | On Whole Life **Rs. 20**

HINDUSTHAN

Co-operative Insurance Society, Ltd.
(ESTD. 1907)
Branches : Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.
Office : throughout India & the East.
S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.
POONA OFFICE — 180, Budhwar Peth.

६ टक्के मासिक आंवक ठेव

डॉन ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें तारीख १-१०-३८चे आंत ठेव ठेवून फायदा मिळवा.

जनरल म्यानेजर—डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

स्वतःचें मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन
त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या"चे योगेंच साधतां येते.

कॉमनवेल्थ विमा कंपनी

लिमिटेड, पुणें.

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेची विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.
ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्यावर लिहा.
रा. न. अभ्यंकर
बी. ए. एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.

दि प्रॉव्हिन्शिअल बँक

ऑफ अिण्डिया लिमिटेड

स्थापना १९३६

मुख्य कार्यालय : २२ / अ, हॉस्पिटल रोड, (सी. ॲण्ड. अेम्. स्टेशन) बंगळूर
शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.
अध्यक्ष : **खानसाहेब हाजी अहमद कासम**, अेम. अेल. सी.
मॅ. डिरेक्टर : **अेस्. पी. ठाकर.**
करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् : १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् : ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयापर्यंत कितीहि वेळा पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करतां येतो.
कायम मुदतीच्या ठेवी : दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्यासंबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.
अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात.
सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.
अधिक माहिती मागवावी.

एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट पुणें.
एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें. २

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२५।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.